



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : २४० वा मंगळवार दि १८ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# आरंभ है प्रचंड! बारामतीत अजित पवारांनी दिला तगडा उमेदवार...

## शरद पवार त्या पराभवाचा वचपा काढणार? की भाजपचं कमळ फुलणार?

**वृत्तसंस्था/बारामती**

बारामती नगर परिषदेची निवडणूक सर्वसाधारण जागेसाठी नगराध्यक्ष पद आरक्षित असले तरी यंदा चांगलीच गाजण्याची चिन्हे आहेत. कारण बारामतीमध्ये भाजपने ओबीसी कार्ड खेळले आहे, तर महाविकास आघाडीदेखील ओबीसी उमेदवार देण्याची शक्यता आहे. मात्र या परिस्थितीत अजित पवारांनी त्यांचा खंदा शिलेदार मैदानात उतरवला आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने बारामती नगरपरिषदेसाठी नगराध्यक्ष म्हणून सचिन सदाशिव सातव यांना निवडणूक रिंगणात उतरवले आहे. भारतीय जनता पक्षाने राष्ट्रीय संघाचे येथील पदाधिकारी व भाजपचे कट्टर समर्थक गोविंद देवकाते यांना नगराध्यक्ष पदासाठी पुढे केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी या सर्वांच्या वतीने महाविकास आघाडी मार्फत उमेदवार उभे करण्यात आले आहेत. यामध्ये महाविकास आघाडीदेखील सर्वसाधारण जागेसाठी ओबीसी कार्ड खेळण्याची शक्यता आहे. त्यांनी नगराध्यक्ष पदाचा उमेदवार उद्या जाहीर करण्याचे सुचित केले आहे. विधानसभा व लोकसभा निवडणुकीनंतर माळेगाव कारखान्यामध्ये पवार विरुद्ध पवार असा सामना झाला आणि यामध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला पराभवाचा मोठा सामना करावा लागला. आता बारामती नगरपरिषदेच्या निवडणुकीत देखील राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाने विरोधकांची मोट बांधत उमेदवार नगरपरिषदेच्या रिंगणात उतरवले आहेत. आता देखील पवार विरुद्ध पवार हा सामना रंगण्याची शक्यता आहे. मात्र, यावेळी तरी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदरात किती यश पडते, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. या निमित्ताने बारामती नगरपरिषदेची निवडणूक राज्यात चर्चिली जाणार हे मात्र नक्की! राष्ट्रवादीची उमेदवार यादी : नगराध्यक्षपद : सचिन सदाशिव सातव, प्रभाग क्र. १ : मनीषा समीर चव्हाण, अविनाश निकाळजे, प्रभाग क्र. २ : जय पाटील, अनुप्रिता डांगे, प्रभाग क्र. ३ : प्रवीण दत्तू माने, रुपाली नवनाथ मलगुंडे, प्रभाग क्र. ४ : विष्णुपंत चौधर, संपदा चौधर, प्रभाग क्र. ५ : किशोर आप्पासाहेब मासाळ,



ऋतुजा प्रताप पागळे, प्रभाग क्र. ६ : अभिजीत जाधव, धनश्री अविनाश बांदल, प्रभाग क्र. ७ : प्रसाद खारतुडे, भारती विश्वास शेळके, प्रभाग क्र. ८ : अमर धुमाळ, श्वेता योगेश नाळे, प्रभाग क्र. ९ : विशाल भानुदास हिंगणे, पूनम ज्योतीबा चव्हाण, प्रभाग क्र. १० : जयसिंग देशमुख, अनीता गायकवाड, प्रभाग क्र. ११ : संजय संघवी, सविता जाधव, प्रभाग क्र. १२ : अभिजीत चव्हाण, सारीका अमोल वाघमारे, प्रभाग क्र. १३ : बिरजू भाऊसाहेब मांढरे, सुनीता अरविंद बगाडे, प्रभाग क्र. १४ : नवनाथ बल्लाळ, आप्पा अहिवळे, प्रभाग क्र. १५ : जितेंद्र बबनराव गुजर, मंगला जयप्रकाश किर्वे, प्रभाग क्र. १६ : मंगल शिवाजीराव जगताप, गोरख पारसे, प्रभाग क्र. १७ : अलताफ सय्यद, शर्मिला शिवाजीराव ढवाण, प्रभाग क्र. १८ : राजेंद्र सोनवणे, अश्विनी सूरज सातव, प्रभाग क्र. १९ : सुनील दादासाहेब सस्ते, प्रतिभा विजय खरात, प्रभाग क्र. २० : प्रथमेश प्रवीण गालिंदे, दर्शना विक्रांत तांबे, फरहीन फिरोज बागवान

# काँग्रेसचा मिठाचा खडा, अखेर मनसेचा मोठा निर्णय, स्वबळावर लढण्याची तयारी सुरु, महायुतीला फायदा?

**वृत्तसंस्था/ नाशिक**

महाविकास आघाडीतल्या मनसेच्या समावेशावरून काँग्रेसने मिठाचा खडा टाकल्यानंतर मनसेने आता स्वबळावर तयारी सुरू केली आहे. आघाडी होत नसेल, तर स्वबळावर लढणार असल्याची भूमिका सरचिटणीस दिनकर पाटील यांनी व्यक्त केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. जानेवारीत महापालिकेच्या निवडणुका होणे अपेक्षित आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेने जोरदार तयारी चालविली आहे. शहरातील सहा विभागांतील ३१ प्रभागांमध्ये बैठका घेऊन निवडणुकांमध्ये पूर्ण ताकदीने उतरण्याचा निर्धार करण्यात आला. प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहा विभागांत प्रभागनिहाय बैठका घेण्यात आल्या. यात पंचवटी, नाशिकरोड, नाशिक मध्य, नाशिक पश्चिम, नाशिक पूर्व, सातपूर आणि नवीन नाशिक भागातील बैठका पूर्ण झाल्या आहेत. मनसे ही निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार असून, महापालिकेवर पक्षाची सत्ता निश्चित येणार आहे. सत्ताधारी महायुतीला पराभूत करण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्रित येऊन स्थानिक पातळीवर महाविकास आघाडी करण्याचा निर्णय घेतला. परंतु, काँग्रेसने मनसेला सोबत घेण्यास स्पष्ट नकार दिला असतानाच मनसेनेही असा कुठलाही प्रस्ताव काँग्रेसला दिलेला नसल्याचे स्पष्ट करीत मनसेची स्वबळाची तयारी असल्याचा दावा दिनकर पाटील यांच्याकडून बैठकांद्वारे केला जात आहे. विविध प्रभागांत आयोजित या बैठकांना प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार व शहराध्यक्ष सुदाम कोंबडे यांनीही केलेली कामे जनतेसमोर मांडण्यास सांगितले, शहर समन्वयक भाऊसाहेब निमसे, प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे आदींनी मार्गदर्शन केले. बैठकांमध्ये नाशिकमधील



सहाही विभागातील पदाधिकाऱ्यांसह अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, इच्छुकांची मते जाणून घेण्यात आली. विभाग अध्यक्षांनी प्रत्येक प्रभागात त्वरित राजदूताच्या नियुक्तीचे आणि प्रत्येक पदाधिकारी, अंगीकृत संघटना, शाखाध्यक्ष व मनसे सैनिकांनी मतदार यादीवर काम करण्याचे निर्देश देण्यात आले. इच्छुकांची नावेही या बैठकीच्या माध्यमातून मागविण्यात आली आहेत.

# ...प्रगतीची सोनपावले...



## संपादकीय लेख

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था येत्या पाच वर्षांत एक लाख कोटी डॉलरचा टप्पा गाठेल, या ङ्कमॉर्गन स्टॅनलीफ्च्या ताज्या अहवालात व्यक्त झालेल्या आशावादातून महाराष्ट्राचे देशातील आघाडीचे स्थान पुन्हा अधोरेखित झाले आहे. सत्ताधारी-विरोधकांच्या याबाबतच्या दाव्या-प्रतिदाव्यांपेक्षा अशा आंतरराष्ट्रीय संस्थेचा निष्कर्ष अधिक विश्वासार्ह व महत्त्वाचा ठरतो. सध्याचे राज्यांतर्गत उत्पादन (जीडीपी) ५३६ अब्ज डॉलर, म्हणजे सिंगापूरच्या बरोबरीने असल्याची बाबही राज्यातील नागरिकांना सुखावणारीच आहे. ङ्कमॉर्गन स्टॅनलीफ्ने विविध क्षेत्रांमधील राज्याच्या प्रगतीचे तपशीलवार चित्र या अहवालात मांडले आहे. त्यामध्ये या प्रगतीमागील कारणे, प्रगती होत असलेल्या क्षेत्रांसह काही आव्हानांचीही चर्चा केल्याचे दिसते. त्यानुसार पावले टाकून सन २०३०पर्यंत सध्याच्या दुपटीने प्रगती करण्याचे आव्हानही या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. वाहनांची निर्मिती आणि सुट्या भागांचे सर्वाधिक उत्पादन महाराष्ट्रात होत असून, देशातील या उत्पादनातील राज्याचा वाटा वीस टक्के आहे. त्याबरोबरच औषधे आणि वैद्यकीय उपकरण निर्मिती १६-१७ टक्के, कापडाचे उत्पादन ८-१२ टक्के इतके आहे. गुजरातपाठोपाठ महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे निर्यातदार राज्य ठरले आहे. देशातील १५.४ टक्के निर्यात महाराष्ट्रातून होत असून, त्याचा देशाच्या ङ्कजीडीपीफ्त १३.७ टक्के इतका वाटा आहे. त्यामध्ये दागिने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, रसायने, औषधे आणि यंत्रसामग्रीचा समावेश होतो. परकीय गुंतवणुकीतही राज्य आघाडीवर असून, गेल्या वर्षी राज्यात १९.६ अब्ज डॉलरची गुंतवणूक झाली आहे. विशेषत: आर्थिक व तंत्रज्ञानातील प्रगतीला गती देणाऱ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील देशातील अठराशे ङ्कग्लोबल केपॅबिलिटी सेंटरफ्की सर्वाधिक (७३०) सेंटर, ही स्पर्धात्मक युगात महाराष्ट्रासाठी विशेष अभिमानाची बाब ठरावी. या अहवालाने गुंतवणुकीसह महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण, निर्यात, आर्थिक शिस्त, साक्षरतेचे प्रमाण आणि स्थिर नेतृत्वाला या प्रगतीचे श्रेय दिले आहे. ङ्कजीडीपीफ्च्या तुलनेत कर्जाचे प्रमाण इतरांच्या तुलनेत कमी, सेवा क्षेत्राचे मोठे योगदान; तसेच धातू, वाहन, अन्नप्रक्रिया, पेट्रोलियम आणि यंत्रसामग्री या क्षेत्रांतील वाटचाल या विकासात महत्त्वपूर्ण ठरली आहे. गेल्या काही वर्षांत राज्यातील औद्योगिक क्षेत्राचे योगदान घटले असून सेवा क्षेत्राचे योगदान वाढत असल्याची नोंद पुढील दिशा दाखवते. आर्थिक प्रगतीमध्ये प्रामुख्याने गुजरात, तमिळनाडू आणि तेलंगण आदी राज्यांशी महाराष्ट्राची स्पर्धा आहे. त्यामुळेच एक लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेच्या मार्गातील आव्हाने ओळखून उपायांची पावले टाकण्याची हीच वेळ आहे. सरकार पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक करीत असून त्यातून वाढवण बंदर, नवी मुंबई विमानतळ, नुकताच पूर्ण झालेल्या समृद्धी महामार्गासह नियोजित नागपूर-गोवा द्रुतगती महामार्गासारख्या सुविधा उभ्या राहत आहेत; मात्र अनेक कारणांमुळे अशा प्रकल्पांना होणारा विलंब टाळून त्यांना अधिक गती देणे आवश्यक आहे. भौगोलिक असंतुलन दूर करून मुंबई-ठाणे-पुणे व नाशिकच्या पलीकडे या विकासाची पावले वळली पाहिजेत. काहीशा मागे पडत असलेल्या उत्पादन क्षेत्राला गती देण्यासाठी नव्या उद्योगांच्या स्थापनेतील लालफीतशाही, भ्रष्टाचार अशा राजकीय-प्रशासकीय त्रुटी दुरुस्त करण्याची गरज आहे. त्यांच्यासाठी रस्ते, स्वस्त आणि अखंडित वीजपुरवठा, वित्तपुरवठा, ऊर्जा व पर्यावरण सुरक्षा यांकडेही विशेष लक्ष पुरवावे लागेल. याच ङ्कमॉर्गन स्टॅनलीफ्च्या एका अहवालानुसार महाराष्ट्रात सुमारे सव्वापाच टक्के इतके बेरोजगारीचे प्रमाण असून, शहरी भाग आणि सुशिक्षितांमध्ये ते अधिक आढळते. हे चित्र बदलण्यासाठी रोजगारक्षम क्षेत्रांमधील आवश्यक कौशल्य प्रशिक्षणावर भर द्यावा लागेल. हे लक्ष्य गाठतानाच स्थलांतर, शहरांमध्ये होणारे केंद्रीकरण, बकालीकरण, सुविधांवर येणारा ताण, हवामान व आरोग्यसंकटे, उत्पन्नातील विषमता या आनुषंगिक आव्हानांचाही सामना करावा लागणार आहे. या वाटचालीची गती कायम ठेवण्यासाठी धोरणसातत्य, ही सर्वांत महत्त्वाची बाब ठरणार आहे; तसेच सध्याचे पराकोटीचे कडवट वातावरण पाहता राजकीय- सामाजिक सलोखा आणि शांतता-सुव्यवस्था, ही प्रगतीची गुरुकिल्ली आहे, हेदेखील विसरून चालणार नाही.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# काही लोक गणतीतच धरत नाहीत' ; पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केली खंत...

**जळगाव :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आज उघडपणे खंत व्यक्त केली आहे. त्यांचा रोख भाजपच्या दिशेला होता. 'जळगाव महापालिकेत योग्य सन्मान मिळाल्यास युतीमधून लढू अन्यथा आपल्या ताकदीवर लढू', असं वक्तव्य मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलं आहे. जळगाव शहरात शिंदेंच्या शिवसेनेत ठाकरेंच्या शिवसेनेतील शेकडो कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. यावेळी ते बोलत होते. 'काही लोक आपल्याला गणतीतच पकडत नाहीत', अशी खंत गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केली. 'गेल्यावेळी आपल्या केवळ १४-१५ जागा निवडून आल्या. मात्र आपण नियोजन समितीच्या माध्यमातून भरघोस निधी उपलब्ध केला', असंही यावेळी गुलाबराव पाटील म्हणाले.

आगामी काळात महापालिकेच्या निवडणुका आहेत. निवडणूक आयोगाला



३१ जानेवारीच्या आत निवडणुका घ्यायच्या आहेत. त्यामुळे तुमची परीक्षा आता जवळ आलेली आहे. त्यामुळे कोणत्या वॉर्डात कोण उभे राहणार याची लगबग प्रत्येक पक्ष करतोय. काही लोकं आपल्याला गणतीतच धरत नाहीत. पण गेल्या वेळी आपण पाहिलं की, वन साईड सत्ता मिळाली. ५७ जागा आपल्या मित्र पक्षांना मिळाले. आपले १५ नगरसेवक निवडून आले होते. आपण १५ नगरसेवकांच्या भरोशावर आपल्या परिने जेवढे काम करता येतील तेवढा करण्याचा प्रयत्न केला', असं गुलाबराव पाटील भाषणात म्हणाले.आता सुद्धा आम्ही त्यांना सांगितलं आहे की, सन्मानाने महायुती होत असेल तर आमची कुठेच आडकाठी नाही. पण सन्माने होत नसेल तर आमची जितकी ताकद आहे त्या भरोशावर आम्ही लढायला तयार आहोत. जिथे सन्मान आहे तिथे प्रत्येक गोष्टीला मान्यता द्यायची असते. जिथे सन्मान नाही... शिवसेना ही जन्माला आल्यापासूनच कधी निवडणुका लढायला आलेली नाही. ती समाजसेवेकरता जन्माला आलेली आहे. ८० टक्के समाजसेवा आणि २० टक्के राजकारण. आपण आज पाहतोय काही लोकं प्रवेश करत आहेत. ते आपल्याला शहराचा विकास करायचा आहे याच विचाराने प्रवेश करत आहेत. मला तरी असं वाटतं की, हा विकास करत असताना आपण सर्वजण एवढ्या संख्येत आले असताना एकनाथ शिंदे यांचं नेतृत्व तुम्हाला मान्य आहे', असा दावा गुलाबराव पाटील यांनी केला.महिला सक्षमीकरणाचे निर्णय एकनाथ शिंदे सरकारने घेतला. पहिला निर्णय हा महिलांसाठी एसटीचं भाडे कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. तर महिलांकरता माझी लाडकी बहीण योजनेचा दुसरा निर्णय घेतला. त्यांनी तिसरा निर्णय हा मुलांनी मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. मुलींना मोफत शिक्षण देणारं महाराष्ट्र हे जगातील एकमेव राज्य आहे. आपला आनंदाचा शिधा काही दिवसांपासून बंद झाला असेल. तो दसरा, दिवाळीला मिळायचा. शिवभोजन योजना सुरु केली. एकनाथ शिंदे यांनी कोतवाल, आशा वर्कर, मदत किसान, पोलीस पाटील, गट प्रवर्ग यांचे पगार वाढवले. दोन वाजता ईर्शारवाडीचा जेव्हा डोंगर कोसळला ते एकमेव मुख्यमंत्री होते जे वरती गेले', असं ते म्हणाले.एकनाथ शिंदे हे एकमेव असे नेते आहेत जे ८० जागा लढले. या ८० पैकी ६० जागा निवडून आले. ४० वर्षात शिवसेनेला जे जमलं नाही ते एकनाथ शिंदे यांनी करुन दाखवलं. आम्ही ज्यावेळेस गुवाहाटीला गेलो त्यावेळेस आमच्यावर किती टीका झाली. पन्नास खोके एकदम ओकेचे आवाज अजूनही कानात ऐकू येतात', अशा भावना गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केल्या.

## गंभीर आरोप करत बड्या नेत्याचा भाजपला रामराम ; मोदींनी दिलेली मोठी जबाबदारी..

**नवी दिल्ली :** भाजप चे माजी केंद्रीय मंत्री आर. के. सिंह यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. पक्षानं आर. के. सिंह यांना ६ वर्षांसाठी निलंबित करत कारणे दाखवा नोटिस बजावली होती. यानंतर आर. के. सिंह यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांना पत्र लिहित भाजप सोडत असल्याचं कळवलं आहे. आपल्या निर्णयाबद्दल त्यांनी सविस्तर माहिती पत्रात दिली आहे.आपलं निलंबन झाल्याचं आणि कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आल्याची माहिती प्रसार माध्यमांच्या मार्फत समजली, असं आर. के. सिंह यांनी पत्रात नमूद केलं आहे. 'पत्रात आरोपांची सविस्तर माहिती दिलेली नाही. त्यामुळे त्या पत्राला योग्य पद्धतीनं उत्तर देणं शक्य नव्हतं,' असं सिंह यांनी पत्रात नमूद केलं आहे.गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांना तिकीट देण्यास माझा विरोध होता. मी केलेलं विधान पक्षविरोधी नाही. मी देश



आणि समाजाच्या हितासाठी बोललो होतो. पक्षातील काही जण राजकारणाचं गुन्हेगारीकरण रोखण्याच्या विरोधात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचं सिंह यांनी पत्राच्या शेवटी नमूद केलं आहे. सिंह यांचा राजीनामा राजकीय वर्तुळात चर्चांचं कारण ठरला आहे. या राजीनाम्यानंतर भाजपच्या प्रदेश आणि राष्ट्रीय पातळीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. आर. के. सिंह यांची स्थिती आणि त्यांच्या कारणांचं आकलन आता पक्ष नेतृत्त्वाकडून करण्यात येईल.

## अजितदादाचा खंदा समर्थक गेला सोडून

**बीड :** अजित पवारांच्या राष्ट्रवादीत सुरु असलेल्या बंडाळीच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे बीड विधानसभा असलेल्या डॉ. योगेश क्षीरसागर यांनी आपल्या पदाचा नुकताच राजीनामा दिला आहे. कालच बीड शहरात डॉ. योगेश क्षीरसागर यांना बाजूला ठेवून राष्ट्रवादीने नगरपालिका निवडणुकीची सूत्रे 'शिवछत्र' म्हणजे माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याकडे दिली होती.या पार्श्वभूमीवर हा राजीनामा आला आहे. डॉ. योगेश क्षीरसागर यांनी आपल्या फेसबुकवर हा राजीनामा प्रसिद्ध केला असून फेसबुक अकाऊंटवर आता फक्त काकू , जयदत्त क्षीरसागर आणि डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचे फोटो ठेवले असल्याचे पहावयास मिळत आहे.अजित पवारांच्या राष्ट्रवादीत बीड जिल्ह्यात सध्या मोठ्याप्रमाणावर गटबाजी सुरु झाली आहे. अगोदर आ. धनंजय मुंडे यांना पक्षातीलच काही लोकप्रतिनिधींनी टीकेचे लक्ष केले होते.

## नगर परिषदेच्या निवडणुकीत महायुतीमध्ये फूट, रा.काँ.आणि भाजप एकत्र

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या भगूर नगरपरिषद निवडणुकीत सत्ताधारी महायुतीमध्ये थेट फूट पडल्याचं चित्र आहे. शिवसेना शिंदे गटाच्या विरोधात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट हा एकत्र ही निवडणूक लढवणार असल्यानं भगूरच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या राजकीय खेळीमुळे आता शिंदे गटाला आव्हान असणार आहे.

भगूरमध्ये आज भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्यांनी संयुक्तिक पत्रकार परिषद घेऊन निवडणुकीची घोषणा केली. त्यांचा थेट मुकाबला महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाशी असणार आहे. या युतीमध्ये, भाजपने राष्ट्रवादी अजित पवार गटाला पाठिंबा जाहीर केला आहे. नगराध्यक्ष उमेदवार म्हणून राष्ट्रवादीच्या प्रेरणा बलकवडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. दुसरीकडे, शिवसेना शिंदे गटाने देखील तातडीने आपल्या उमेदवारांची घोषणा करत निवडणुकीत उतरण्याची तयारी केली आहे. शिवसेनेचे नेते विजय करंजकर यांच्या पत्नी अनिता करंजकर यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.या नव्या युतीनंतर शिवसेनेचे स्थानिक नेते विजय करंजकर यांनी आक्रमक भूमिका घेतली असून, अनेक वर्षांपासून भगूर नगरपरिषद करंजकर यांच्या ताब्यात आहे. त्यांनी थेट इशारा देत, 'आम्ही या युतीला एकही जागा जिंकू देणार नसून, करंजकर यांनी यावेळी राष्ट्रवादीच्या आमदार सरोज अहिरे यांना देखील लक्ष्य करत, 'पक्षाने आदेश दिले होते म्हणून विधानसभा निवडणुकीत आम्ही गप्प राहिलो, नाहीतर शिवसेनेची ताकद तेव्हाच दाखवली असती,' असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

# स्थानिक निवडणुकांतही विरोधकांचा सुपडा साफ होणार, मुख्यमंत्र्यांचा विरोधकांवर हल्लाबोल, म्हणाले, 'भाजप मोठा पक्ष'

**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आज छत्रपती संभाजीनगर दौरा आहे. यावेळी त्यांनी विभागीय कार्यालयाचं उद्घाटन केलं आहे. मोठ्या संख्येनं जमलेल्या कार्यकर्त्यांना त्यांनी यावेळी मार्गदर्शन केलं आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर देवेंद्र फडणवीसांचा हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.यावेळी भाषणात मुख्यमंत्री म्हणाले की, 'बिहारच्या जनतेने मोदींवर विश्वास दाखवत नितेश कुमार यांच्या सुधनावर विश्वास दाखवत विरोधकांचा सुपाडा साफ केला. याबद्दल बिहार जनतेचे आभार मानतो. आपला विजयाचा रथ सातत्याने पुढे जात आहें. मोदींवर सर्वांचा विश्वास आहे. विरोधकांचा फेक नेरेटीव आपण हाणून पडला आहे. विरोधकांना जनतेत गेल्यावर कळेल नेमकं काय झालं. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही विरोधकांची पुन्हा हीच परिस्थिती होणार आहे,' असा इशारा फडणवीसांनी विरोधकांना दिला आहे.भाजपाच्या वाटचालीत प्रमोद महाजन गोपीनाथ मुंडे यांनी सातत्याने आपली कार्यालये झाली पाहिजे पक्षाला स्थैर्य अल पाहिले यासाठी खूप प्रयत्न केले. त्याकाळी मिळेल ते कार्यालय घेतले आहे. २०१४ साली सरकार आले. देशात अमित शहा यांनी सांगीतले प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय झालं पाहजे. तेव्हापासून प्रत्येक जिल्ह्यात जागा घेऊन परवानगी घेणे, हे




काम सुरू आहे. कुठेही सरकारी किंवा अनधिकृत कार्यालय घ्यायचं नाही. छत्रपती संभाजीनगर शहरातील हे विभागीय कार्यालय आहे. विमानतळाच्या जवळ जागा असल्याने ही जागा निश्चित केली आहे. या कार्यालयातून जनतेच्या किती समस्या सोडवतो, हे महत्त्वाचं असतं, आपण जनसामान्यांच्या समस्या सोडवणार आहोत.मराठवाड्यात सरकारने अनेक चांगली कामे केली. छत्रपती संभाजीनगर शहरातील पिण्याच्या पाण्याची योजना आपण मंजूर केली आहे. इथे राष्ट्रवादी, उबठा यांना लाजही वाटत नाही. आपण मंजूर केले योजना ८०० कोटीचा कर राज्य सरकार भरणार असा निर्णय केला आहे. आंदोलन करणाऱ्यांचा सरकार आल्यानंतर ८०० कोटी रुपये महापालिकेने भरावे असा निर्णय केला, यामुळे काम थांबलं. आता आपल सरकार आल्यानंतर पैसे दिले आहेत. देशाचा इलेक्ट्रिक वाहन कॅपिटल छत्रपती संभाजीनगर होत आहे, असही यावेळी फडणवीस म्हणाले.समृद्धी महामार्गामुळे शहराला फायदा झाला, मराठवाड्यातील सिंचन, नदीजोड प्रकल्प सरकारने केले आहेत. शेतकऱ्यांवर संकट आल्यावर राज्य सरकार शेतकऱ्याच्या पाठीशी उभे राहिले आहे. उद्धव ठाकरे मराठवाड्यात आले तेव्हा अंबादास दानवे माणसं शोधत होते. लोकांना माहिती आहे यांच्याकडं काही नाही. आपल्याला प्रत्येक निवडणुकीत प्रचंड विजय मिळवायचा आहे.

# वहिनीसोबतच्या प्रेमासाठी सख्ख्या भावाला संपवलं, मृतदेह पोत्यात टाकला, तलावात फेकला

**जालना :** जालन्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अनैतिक संबंधात अडथळा ठरत असलेल्या पतीची पत्नी आणि त्याच्याच सख्ख्या भावाने मिळून कुऱ्हाडीने वार करून निर्घृणपणे हत्या केल्याची संतापजनक बाब समोर आली आहे. ज्ञानेश्वर राम तायडे (वय २८) आणि मनिषा परमेश्वर तायडे (वय २५) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या दोघांनी मिळून परमेश्वर तायडे (वय ३०) याची हत्या केली आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह सोमठाणा तलावामध्ये फेकून दिला. सोमठाणा येथील मनिषा तायडे हिचे आणि सख्ख्या दीराचे ज्ञानेश्वर तायडेसोबत अनैतिक प्रेमसंबंध होते. या संबंधांमध्ये मनिषाचा पती परमेश्वर राम तायडे हा अडथळा ठरत होता. त्यामुळे दोघांनी मिळून परमेश्वरला





कायमचं संपवण्याचा कट रचला.

१५ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास ज्ञानेश्वर आणि मनिषाने परमेश्वरच्या डोक्यात आणि चेहऱ्यावर कुऱ्हाडीने वार करून त्याची निर्घृणपणे हत्या केली. त्यानंतर, त्यांनी परमेश्वरचा मृतदेह एका गोणीत भरला आणि त्याला दगड बांधून सोमठाणा तलावात फेकून दिला, जेणेकरून मृतदेह पाण्यावर तरंगणार नाही. परमेश्वर घरी आला नसल्याचं गावभर पसरलं, आणि सर्वत्र चर्चा सुरू झाली. या दोघांमधील अनैतिक संबंधांची कुणकुण गावकऱ्यांना आधीपासून होती, त्यामुळे संशयाचं वातावरण निर्माण झालं. ही माहिती बदनापूर पोलिसांना मिळताच त्यांनी तातडीने तपास सुरू केला.बदनापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक एम. टी. सुरवसे यांच्या माहितीनुसार, परमेश्वर तायडे गेल्या महिन्याभरापासून बेपत्ता झाला होता. त्याची पत्नी मनीषा हिनेच त्याच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल केली होती आणि काही दिवस पतीला शोधण्याचा ती दिखावा करत होती. मात्र, बुधवारी सोमठाणा परिसरातील तलावात संशयास्पद अवस्थेत परमेश्वरचा मृतदेह आढळून आला, त्यानंतर पोलिसांनी तपासाची दिशा बदलली.चौकशीत त्याच्या कुटुंबीयांचे जबाब परस्परविरोधी निघाल्याने पोलिसांचा संशय वाढला. पुढील तपासात उघड झालं की मनीषा आणि ज्ञानेश्वर यांच्यात अनैतिक संबंध होते. परमेश्वर या संबंधांना विरोध करत असल्यानं दोघांनी त्याला मार्गातून दूर करण्याचा निर्णय घेतल्याचं निष्पन्न झालं. पोलिसांच्या माहितीनुसार, १५ ऑक्टोबरच्या रात्री ज्ञानेश्वरने परमेश्वरवर दगडाने आणि कुऱ्हाडीने हल्ला केला, तर मनीषाने त्याच्या गळ्यात कापड आवळून त्याचा जीव घेतला. त्यानंतर दोघांनीही मृतदेह गोणीत गुंडाळून, त्याला दगड बांधून जवळच्या तलावात फेकून दिला. जवळपास महिनाभरानंतर मृतदेह वर आला आणि ग्रामस्थांनी पोलिसांना माहिती दिली. पोस्टमार्टम अहवालात हत्या झाल्याचु स्पष्ट झाल्यावर पोलिसांनी दोघांना अटक केली. या अमानुष कृत्यात पतीची हत्या करणाऱ्या पत्नी आणि सख्ख्या भावाबाबत गावात मोठा संताप उसळला आहे.

## हुंड्यासाठी माझ्या लेकीचा जीव घेतला, बापाची कोर्टात धाव..

**लखनऊ :** एका व्यक्तीने आपली मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार करत पती आणि सासरच्या लोकांवर हुंड्यासाठी तिची हत्या केल्याचा आरोप केला. याप्रकरणी न्यायालयात खटलाही दाखल करण्यात आला. दोन वर्षांपूर्वी हुंड्यासाठी त्याच्या मुलीची हत्या करण्यात आली होती आणि तिच्या सासरच्या लोकांनी तिचा मृतदेह फेकून दिल्याचा दावा वडिलांनी केला आहे. उत्तर प्रदेशातील बांदा येथून ही धक्कादायक घटना समोर आली आहे. मार्का पोलीस स्टेशन परिसरातील हे प्रकरण असल्याची माहिती आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर, पोलिसांनी २ सप्टेंबर २०२५ रोजी हुंडाबळी प्रकरणी एफआयआर नोंदवला आणि तपास सुरू केला. पोलिस अधीक्षक पलाश बन्सल यांच्या सूचनेनुसार, डीएसपी सौरभ सिंग यांनी तपास हाती घेतला. तपास पुढे सरकत असताना, एक धक्कादायक तथ्य समोर आले. हुंडाबळी प्रकरणी मृत घोषित करण्यात आलेली ती तरुणी ही प्रत्यक्षात जिवंत आढळून आली. पोलिसांनी तिला महाराष्ट्रातून ताब्यात घेतलं आहे.या प्रकरणाच्या तपासात




असं दिसून आले की, महिलेचा विवाह २३ फेब्रुवारी २०२३ रोजी झाला होता. तथापि, ती ऑक्टोबर २०२३ पासून तिच्या ओळखीच्या एका पुरूषासोबत राहत होती. कुटुंबाला याची माहिती नव्हती. बेपत्ता व्यक्तीची तक्रार दाखल करण्याऐवजी वडिलांनी हुंडाबळी खटला दाखल केल्याची माहिती आहे.याप्रकरणी पोलिस सध्या तरुणीकडे ती घर का सोडून गेली आणि त्या काळात ती कुठे राहिली याबद्दल चौकशी करत आहे. डीएसपी सौरभ सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्का पोलिस स्टेशन परिसरात राहणाऱ्या एका पुरूषाने त्याची मुलगी बेपत्ता झाल्यानंतर न्यायालयात हुंडाबळीचा खटला दाखल केला होता. सर्व पुरावे आणि तपासानंतर, कथित मृत व्यक्ती सापडली आहे.

## मुंबईहून गावी आलेल्या इसमाची आत्महत्या

**रत्नागिरी :** कोकणात अलीकडे जीव देण्याचं प्रमाण वाढलं आहे. अशीच एक दुर्दैवी घटना खेड तालुक्यात बोरघर येथे झाली आहे. मुंबई येथून गावी खेड बोरघर येथे आलेल्या ४५ वर्षीय इसमाने आपल्या आयुष्याची अखेर केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. सुधीर लक्ष्मण पार्टे (वय-४५) असं या तरुण इसमाचे नाव आहे.खेड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुधीर लक्ष्मण पार्टे हे कुटुंबासहित मुंबई येथे एक खाजगी नोकरी करत होते. मात्र, ते आठवडाभरापूर्वी त्यांच्या खेड तालुक्यातील बोरगाव या गावी आले होते. गावी आल्यानंतर त्यांनी घराच्या आजूबाजूला स्वच्छता केली, बेणणी केली. याच दरम्यान ते शेजारी असलेल्या भावाकडे भोजनासाठी चार दिवस जात होते. मात्र, नेहमी येणारा भाऊ आज दुपारी जेवायला का नाही आला हे पाहायला त्यांचे मोठे बंधू दिलीप हे सुधीर यांच्या घरी गेले. त्या वेळेला त्यांना भाऊ गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. हे दृश्य पाहून भावाला मोठा धक्का बसला. यावेळी हा सगळा धक्कादायक प्रकार समोर आला.

## लेकीसोबत अखेरची भेटही होऊ शकली नाही ; मुलीच्या घरी जाताना वाटेत मृत्यू

**पंढरपूर :** लेकीला भेटून येतो, असं सांगून घरातून निघाले ते कधीही न परतण्यासाठीच. घरातून निघाले पण लेकीच्या घरी पोहोचण्यापूर्वीच बापाचा मृत्यू झाला. तिकडे लेक बाबा येतील म्हणून दाराकडे डोळे लावून बसली होती. पण, आली ते वडिलांच्या मृत्यूची बातमी. वाटेत एका भरधाव वाहनाने त्यांना धडक दिली, ज्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तर, बाबांची अखेरची भेटही होऊ न शकल्याने लेकीने सुन्न करणारा आक्रोश केला. तर या घटनेने कुटुंबालाही मोठा धक्का बसला आहे. तर, ज्या वाहन चालकाने या व्यक्तीच्या दुचाकीला धडक दिली, तो सध्या फरार असून त्याचा शोध सुरु आहे.मंगळवेढा ब्रह्मपुरी या राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी (१५ नोव्हेंबर) सायंकाळी एक भीषण अपघात घडला. या घडलेल्या भीषण अपघातात ६० वर्षीय बब्रुवहान यशवंत सोनवणे (राहणार ब्रह्मपुरी) यांचा जागीच मृत्यू झाला आहे. लेकीला भेटण्यासाठी घरातून निघालेल्या बब्रुवहान सोनवणे यांचा लेकीच्या घरी जाण्याचा हा प्रवास अखेरचा ठरला आहे. पाठीमागून आलेल्या कारणे दिलेल्या भरधाव धडकेत त्यांच्या मोटरसायकलचा चेंदामेंदा झाला आणि त्यातच त्यांचा जागेवरच मृत्यू झाला.याबाबतची फिर्याद किशोर सोनवणे यांनी दिली असून



दिवंगत बब्रुवहान सोनवणे हे दुचाकीवरून मंगळवेढ्याकडे जात होते. यावेळी इंडियन पेट्रोल पंपाजवळील पाटील वस्ती परिसरात ते पोहोचताच के ए ४८ एम ४२०५ या कारच्या चालकाने भरधाव वेगात येत मागून त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात झाल्यानंतर तो कारचालक थांबून मदत करणे तर दूरच तो घटनास्थळावरून थेट पसार झाला.ही धडक इतकी जबरदस्त होती की सोनवणे यांना सावरण्याचीही संधी मिळाली नाही. अपघातानंतर गाडीचा चेंदामेंदा झाला, तर सोनवणे यांना रस्त्यावर पडलेलं पाहून आसपासचे लोक धावत आले. त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आलं, मात्र तिथे त्यांना मृत घोषित केलं.

# मेहंदीत 'अखंड सौभाग्यवती' ; पण लग्नाच्या काही तासांआधी साजनने..

**भावनगर (गुजरात) :** एका २२ वर्षीय तरूणीसाठी तिच्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा दिवस शेवटचा ठरला आहे. गुजरातच्या भावनगर परिसरात राहणाऱ्या सोनी हिंमत राठोड हिची, स्वतःच्या लग्नाच्या दिवशीच, घरात हत्या झाल्याची खळबळजनक घटना समोर आली. इतकेच नव्हे तर, तिच्या होणाऱ्या नवऱ्यावरच तिची हत्त्या केल्याचा आरोप आहे. साजन खगणा बरैया (२६) असे तिच्या होणाऱ्या नवऱ्याचे नाव होते आणि सध्या तो फरार आहे.ही घटना प्रभुदास तलावाजवळील राठोड यांच्या घरात शनिवारी पहाटे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साजन पहाटे अचानक सोनीच्या घरी पोहोचला. दोघांमध्ये नवरीच्या पानेतरवरून (लग्नात घातलेले पारंपारिक पोशाख) वाद सुरू झाला आणि तो वाद पैशांवरून अधिकच चिघळला. या वेळी घरातील इतर मंडळी झोपलेले होते, त्यामुळे या वादाचे रूपांतर मारहाणीत कधी झाले हे त्यांना समजलेच नाही. सोनीच्या हातावर 'आय लव्ह साजन' चा टॅटू आणि दुसऱ्या हातावर अखंड सौभ्यागवतीची मेहंदी रंगवलेली होती.दोघांमध्ये भांडण होत असतानाच अचानक




साजनने घरात पडलेला लोखंडी पाइप उचलला आणि सोनीवर सतत वार करायला सुरुवात केली. तिच्या डोक्यावर आणि शरीरावर गंभीर जखमा दिसून आल्या आहेत. एवढ्यावरच न थांबता, त्याने तिचे डोके भिंतीवर आपटले, ज्यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला. झालेल्या गोंधळामुळे कुटुंबीय जागे झाले; परंतु ते खोलीत पोहोचले तेव्हा सोनी मृतावस्थेत होती, आणि साजन घरातून पळून गेला होता.आर. आर. सिंगल, उपविभागीय पोलिस अधिकारी, भावनगर शहर विभाग, यांनी सांगितले की सोनी आणि साजन मागील दीड वर्षापासून एकमेकांसोबत होते. कुटुंबियांना हे नाते पसंत नव्हते; परंतु समुदायातील लोकांनी मध्यस्थी केल्यानंतर दोन्ही घरांनी हे लग्न मान्य केले. १५ नोव्हेंबर हा विवाहदिन ठरला होता. शुक्रवारी काही पारंपरिक विधी पार पडले होते, तर शनिवारी मुख्य सोहळा होणार होता.घटनेनंतर, कुटुंबीयांनी तात्काळ पोलिस नियंत्रण कक्षाला संपर्क साधल्यानंतर, गंगाजळयि पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात हलवण्यात आला. डायएसपी सिंगल यांनी सांगितले की, आरोपी साजन बरैया याच्यावर या आधीही अनेक गुन्हे दाखल झाले आहेत. खुनाचा प्रयत्न, लूटमार, मारहाण अशा विविध गंभीर आरोपांची नोंद त्याच्यावर आहे. सध्या तो फरार असून, पोलिस त्याच्या शोध घेत आहेत.

# भारताचा लाजीरवाणा पराभव पण तरीही गंभीर यांनी या एका व्यक्तीचे केले सर्वांसमोर कौतुक

**कोलकाता :** भारताला पहिल्या कसोटी सामन्यात लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला. पण या पराभवानंतरही भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी एका व्यक्तीचे सर्वांसमोक कौतुक केले.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी त्यांना हीच खेळपट्टी हवी होती. १२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा संघ ९३ धावांवर आटोपला आणि ३० धावांनी मानहानीकारक पराभव झाला. भारताचे दक्षिण आफ्रिकेने यावेळी वस्त्रहरण केल्याचे पाहायला मिळाले. कारण भारताच्या एका खेळाडूलाही समर्थपणे गोलंदाजीचा सामना करता आला नाही, त्यामुळेच भारताला दारुण पराभव पत्करावा लागला.गौतम गंभीर सामना संपल्यावर म्हणाले की, ‘ खेळपट्टी असे नाही की ती खेळण्यायोग्य नव्हती. जी खेळपट्टी आम्ही मागितली होती आणि तीच आम्हाला मिळाली. मला वाटते की ही एक अशी खेळपट्टी होती जी तुमच्या मानसिक कणखरतेचे मूल्यांकन करू शकते. कारण जे चांगले बचाव करून खेळतात त्यांनी धावा



काढल्या आहेत. हीच खेळपट्टी आम्हाला हवी होती. त्यात कोणतीही कमतरता नव्हती. अक्षर पटेल, टेम्बा बवुमा आणि वॉशिंग्टन सुंदरने धावा काढल्या. जर तुम्ही म्हणाल की ही टर्निंग विकेट आहे, तर वेगवान गोलंदाजांनीही खूप विकेट घेतल्या आहेत. टॉस हा एक घटक बनू नये म्हणून आम्ही पहिल्या दिवसापासूनच फिरकीपटूंना अनुकूल खेळपट्टीची मागणी करत आहोत. जर आम्ही कसोटी जिंकली असती तर खेळपट्टीबद्दल इतकी चर्चा करणे कठीण झाले असते. त्यामुळे इडन गार्डन्सचे क्युरेटर सुजन मुखर्जी यांचे आभार, त्यांनीआम्हाला खूप मदत केली. आमच्याकडे असे खेळाडू आहेत जे कोणत्याही परिस्थितीत चांगली कामगिरी करू शकतात.‘ भारतावर तिसऱ्याच दिवशी पराभवाची नामुष्की ओढवली. पण तरीही गौतम गंभीर यांनी मैदानाच्या क्युरेटरचे कौतुक केल्याचे पाहायला मिळाले आहे.भारतासाठी विजयाचे आव्हान जास्त मोठे नव्हते. पण तरीही त्यांना हा सामना जिंकता आला नाही. कारण भारताचे फलंदाज हे चांगल्यापद्धतीने फिरकी गोलंदाजी खेळू शकले नाही आणि हेच भारताच्या पराभवाचे खरे कारण ठरले आहे. त्यामुळे आता पुढच्या सामन्यात भारतीय खेळाडू कशी कामगिरी करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

## पराभवानंतर गांगुली-गंभीरमध्ये जोरदार राडा

**कोलकाता :** भारताचा पहिल्या सामन्यात मानहानीकारक पराभव झाला. हा पराभव भारतीयांना चांगलाच जिव्हारी लागला आहे. पण या पराभवानंतर भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली आणि भारताचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यात जोरदार राडा पाहायला मिळाले. गांगुली यांनी यावेळी गंभीर यांच्यावर सडकून टीका केल्याचे पाहायला मिळाले.भारताच्या या सामन्यापूर्वीच गांगुली आणि गंभीर यांच्या खटके उडाले होते. कोलकाताच्या इडन गार्डन्सचे क्युरेटर सुजन बॅनर्जी यांनी फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही गोष्टींना साथ देणारी खेळपट्टी बनवली होती. पण गौतम गंभीर यांनी फिरकीला पोषक खेळपट्टी बनवायला सांगितली. पण बॅनर्जी यांनी यासाठी नकार दिला होता. पण गंभीर आपल्या मागणीवर ठाम राहीले आणि तशी खेळपट्टी बनवून घेतली. त्यानंतर सौरव गांगुलीने या वादात उडी घेतली होती. गांगुली म्हणाले होते की, खेळपट्टीबाबत भारतीय संघातील कोणीही काहीच मागणी केलेली नाही.सामना संपल्यावर सौरव गांगुली म्हणाले की, ‘ माझ्यासाठी गौतम गंभीर यांच्यासाठी भरपूर वेळ आहे. पण गौतम गंभीर यांनी आपल्या लोकांवर विश्वास ठेवायला शिकायला हवे. त्यांनी पाच दिवसांचा कसोटी सामना खेळायला हवा, फक्त तीन दिवसांत कसोटी सामने संपवण्याचा प्रयत्न करु नये. मला आशा आहे गंभीर ही माझी सूचना नक्कीच ऐकतील. ‘ गौतम गंभीर यांना जर अशी खेळपट्टी हवी असेल तर सामना तीन दिवसांतच संपली, अशी टीका गांगुली यांनी यावेळी



केली.गंभीर यांनी यावर आपले मत व्यक्त केले. गंभीर म्हणाले की, ‘ ही खेळपट्टी खेळण्यासाठी लायक नव्हती, असे नाही. आम्ही जशी खेळपट्टी मागितली होती, तशीच आम्हाला मिळाली. क्युरेटर सुजन बॅनर्जी यांनी चांगले काम केले. माझ्यामते ही अशी खेळपट्टी आहे की, जी मानसीक क्षमतेचे आकलन करू शकते. ‘ गौतम गंभीर यांनी फिरकीला पोषक असलेली खेळपट्टी मागितली होती. गंभीर यांच्या मनाप्रमाणे खेळपट्टी बनवली आणि भारत हरला. पण पराभवानंतरही गंभीर यांनी आपल्या निर्णयाचे समर्थन करत गांगुली यांच्यावर पलटवार केला आहे. सौरव गांगुली आणि गौतम गंभीर यांच्यात चांगलीच जुंपली आहे. आता गंभीर यांना गांगुली काय उत्तर देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

## न्यूझीलंडने जिंकली वनडे मालिका

**ख्राईस्टचर्च :** सामनावीर डॅरियल मिचेलच्या शानदार शतकाच्या जोरावर रविवारी येथे यजमान न्यूझीलंडने ३ सामन्यांच्या वनडे मालिकेत विजयी सलामी देताना विंडीजचा केवळ ७ धावांनी पराभव केला. ख्राईस्टचर्चच्या खेळपट्टीवर फलंदाजांना धावा घेणे खूपच अवघड गेले. या सामन्यात विंडीजने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजी दिली. न्यूझीलंडने ५० षटकात ७ बाद २६९ धावा जमविल्या. त्यानंतर विंडीजने ५० षटकात ६ बाद २६२ धावांपर्यंत मजल मारल्याने त्यांना हा सामना थोडक्यात गमवावा लागला.

विंडीजच्या डावाला चांगली सुरुवात झाली नाही. तिसऱ्या षटकात जेमीसनने सलामीच्या कॅम्पबेलला केवळ ४ धावांवर झेलबाद केले. त्यानंतर अथांझे व कार्टी या जोडीने दुसऱ्या गड्यासाठी १८ षटकात ६० धावांची भागिदारी केली. अथांझेने ५८ चेंडूत १ षटकार आणि २ चौकारांसह २९ धावा जमविल्या. कार्टीने ६७ चेंडूत २ चौकारांसह ३२ धावा केल्या. कर्णधार शाय हॉपने ४५ चेंडूत १ षटकार आणि २ चौकारांसह ३७ धावा झळकाविल्या. रुदरफोर्डने ६१ चेंडूत ३ षटकार आणि ३ चौकारांसह ५५ तर चेसने १ षटकारासह १६ धावा केल्या. ३९.२ षटकात विंडीजने ५ बाद १६९ धावांपर्यंत मजल मारली होती. त्यांना शेवटच्या १० षटकात विजयासाठी १०० धावांची गरज होती. रुदरफोर्ड आणि ग्रीव्हेस यांनी ६ व्या गड्यासाठी ४० धावांची भर घातली. रुदरफोर्ड ४६ व्या षटकात बाद झाला. ग्रीव्हेस आणि शेफर्ड या जोडीने सातव्या गड्यासाठी ५३ धावांची भागिदारी केली. पण त्यांना विजयासाठी ८ धावा कमी पडल्या. विंडीजने ५० षटकात ६ बाद २६२ धावांपर्यंत मजल मारली. ग्रीव्हेसने २४ चेंडूत १ षटकार आणि ३ चौकारांसह नाबाद ३८ तर शेफर्डने १९ चेंडूत १ षटकार आणि १ चौकारासह नाबाद २६ धावा जमविल्या. विंडीजच्या डावात २५ अवांतर धावा मिळाल्या.

## आयपीएलच्या सर्वात मोठ्या ट्रेड डील मागे धोनीचा हात ? जडेजा राजस्थानमध्ये जाताच..



**मुंबई :** आयपीएल रिटेन्शन काल पार पडलं. अनेक संघानी मोठे मोठे धक्कादायक निर्णय घेतलेले पाहायला मिळाले. सर्वात मोठी ट्रेड डील ही राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात रंगली. राजस्थानने संजू सॅमसनला सोडण्याचा निर्णय घेतला. तर चेन्नईने संजूला संघात सामील केले आणि या बदल्यात ठरींळपवीर गरवशक्षर अपव डरा ग्रींशिप राजस्थानला दिले. आता जडेजा राजस्थानकडे जाण्यामागे महेंद्र सिंग धोनीचा हात असल्याचे म्हटले जात आहे. रवींद्र जडेजाच्या सीएसके सोडण्याने राजस्थान रॉयल्समध्ये जाण्यापेक्षा जास्त चर्चा निर्माण झाली आहे. राजस्थान रॉयल्सने संजू सॅमसनला सीएसकेमध्ये आणण्याच्या बदल्यात रवींद्र जडेजा आणि सॅम करनचा समावेश त्यांच्या संघात केला. १२ वर्षांनंतर जडेजाने सीएसके सोडण्यास कसे सहमती दर्शविली हा देखील चर्चेचा विषय आहे. जडेजाला संघ सोडण्यास भाग पाडले गेले का असा प्रश्न निर्माण होत आहे. आता, एका मीडिया रिपोर्टमध्ये असे उघड झाले आहे की एमएस धोनी आणि रवींद्र जडेजा यांनी व्यापार करार अंतिम होण्यापूर्वी उघडपणे चर्चा केली. क्रिकबझच्या मते, व्यापार करार सुरू होण्यापूर्वीच जडेजा आणि धोनी यांनी उघडपणे चर्चा केली. जडेजाचे सीएसके सोडणे सर्वांच्या हिताचे असेल यावर त्यांनी सहमती दर्शविली.

त्याच रिपोर्टनुसार, नूर अहमदचे चेन्नई सुपर किंग्जमध्ये जाण्यामुळे सीएसके व्यवस्थापनाला संघात जडेजाच्या भूमिकेसाठी वेगवेगळे पर्याय शोधण्याची परवानगी मिळाली असती. यामुळे प्लेइंग इलेव्हनमधील त्याचे स्थान धोक्यात आले. धोनीने याबद्दल जडेजाशी उघडपणे चर्चा केली, त्यानंतर जडेजानेही सहमती दर्शवली की चेन्नई संघ सोडणे त्याच्यासाठी योग्य असेल.गेल्या वर्षी रवींद्र जडेजाला सीएसकेने १८ कोटी रुपयांना कायम ठेवले होते हे देखील आश्चर्यकारक आहे, परंतु राजस्थान रॉयल्सने त्याला १४ कोटी रुपयांना खरेदी केले. या प्रकरणावर चर्चा करताना माजी भारतीय क्रिकेटपटू आकाश चोप्रा म्हणाले की, जडेजा १४ कोटी रुपयांना सीएसके सारखा संघ सोडून राजस्थान रॉयल्समध्ये गेल्याने तो खूश नाही.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेवटचे काही दिवस : प्रणित मोरेबद्दल स्पष्ट बोलला रोहित शेट्टी; म्हणाला, गौरव खन्नामुळे तुझा

**मुंबई :** 'बिग बॉस १९' सुरू होऊन ८० हून आधी दिवस झाले आहेत. आता हा शो महाअंतिम सोहळ्याच्या दिशेने जात आहे. 'बिग बॉस'मध्ये आलेल्या काही स्पर्धकांचा एकेक करत प्रवास संपला आहे आणि आता 'बिग बॉस'च्या घरात काही मोजके स्पर्धक उरले आहेत.

'बिग बॉस १९'च्या घरात आता प्रणित मोरे, गौरव खन्ना, अशनूर कौर, अमाल मलिक, मालती चहर, फरहाना भट्ट, कुनिका सदानंद, तनय मित्तल आणि शेहबाज बदेशा हे नऊ स्पर्धक उरले आहेत; त्यामुळे आता या नऊ स्पर्धकांमध्ये घरात टिकून राहण्यासाठी आणि महाअंतिम सोहळ्यापर्यंत पोहचण्यासाठी चढाओढ सुरू आहे.

'बिग बॉस'च्या घरात गौरव, अशनूर, प्रणित यांचा ग्रुप आहे. यात गौरवच्या बोलण्यामुळे प्रणित आणि अशनूर यांचा खेळ दिसत नसल्याचं मत रोहित शेट्टीनं नुकत्याच झालेल्या 'वीकेंड का वार'मध्ये मांडलं. तसंच यावेळी रोहितनं आता स्पर्धा संपायला मोजकेच दिवस शिल्लक राहिलेत, त्यामुळे आपला वैयक्तिक खेळ सुधारावा अशा सूचनाही दिल्या.



शनिवारी झालेल्या 'वीकेंड का वार'मध्ये रोहितनं प्रणितला म्हटलं की, तुझा आणि मालतीचा चांगला बॉण्ड होता, तुम्ही दोघे एकत्र वेळ घालवत होता, पण गौरवनं तुला मालतीबद्दल सांगितल्यानंतर तू मालतीशी बोलणं बंद केलं आहेस, त्यामुळे तुझ्या खेळावर गौरवचा प्रभाव पडत असल्याचं दिसत आहे. जे जे गौरव मालतीबद्दल म्हणाला होता आणि त्यानंतर तू जेव्हा मालतीबरोबर गप्पा मारत होतास, तेव्हा गौरव जे जे बोलला तेच तू तिच्याशी बोलताना दिसलास, यामुळे तुझ्यावर गौरवचा प्रभाव असल्याचं दिसत आहे.

यानंतर रोहितनं प्रणितला म्हटलं, आता केवळ तीन आठवडे शिल्लक राहिले आहेत. तू चांगलाच खेळत आहेस, पण तरी स्वत:च्या खेळावरही लक्ष दे; नाहीतर नजर हटी और दुर्घटना घटी: यावर प्रणितनंही उत्तर देत म्हटलं की, इथे या घरात कुणाची एखादी गोष्ट ऐकली तरी इतरांना वाटतं की, त्याचा माझ्यावर पराभव पडतोय. पण असं काहीच नाहीय. मी तुमच्या सूचनांचा नक्कीच स्वीकार करेन आणि माझा खेळ सुधारेन.

दरम्यान, बिग बॉस १९ च्या या आठवड्यात शेहबाज सोडून सगळेच स्पर्धक नॉमिनेट झाले आहेत. काही वृत्तांनुसार, या आठवड्यात कुणाचंच नॉमिनेशन होणार नसल्याची माहिती आहे. पण, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत अपडेट समोर आलेली नाही, त्यामुळे या आठवड्यातील एलिमिनेशनबाबत जाणून घेण्याची प्रेक्षकांना उत्सुकता लागून राहिली आहे.

## 'द पॅराडाइज'मध्ये सोनाली कुलकर्णी

**मुंबई :** 'द पॅराडाइज' चित्रपटाच्या निर्मात्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मुख्य नायिका सोनाली कुलकर्णीचा फर्स्ट लुक जारी केला आहे. या चित्रपटात मुख्य भूमिकेत नानी आहे, तर याचे दिग्दर्शन श्रीकांत ओडेला करत आहे. चित्रपटातील सोनाली कुलकर्णीची भूमिका अत्यंत वेगळी असल्याचे निर्मात्यांकडून सांगण्यात आले आहे. हा चित्रपट पुढील वर्षी २६ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. दिग्दर्शक श्रीकांत ओडेला आणि नानी यांनी यापूर्वी 'दसरा' चित्रपटासाठी एकत्र काम केले होते. तर द पॅराडाइज हा चित्रपट नानीच्या कारकीर्दीतील सर्वात मोठा आणि खास प्रोजेक्ट असल्याचे मानले जात आहे. एसएलव्ही सिनेमाच्या सहकार्यातून निर्मित 'द पॅराडाइज' चित्रपट ८ भाषांमध्ये म्हणजेच हिंदी, तेलगू, इंग्रजी, स्पॅनिश, बंगाली, कन्नड आणि मल्याळी भाषेत प्रदर्शित होणार आहे.



## दे दे प्यार दे २नं वीकेंडला कमावले २ कोटी

**मुंबई :** 'सन ऑफ सरदार २'नंतर अजय देवगणचा आणखी एक रोमँटिक-कॉमेडी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. जो सध्या बॉक्स ऑफिस गाजवत आहे. अजय देवगणच्या 'दे दे प्यार दे २' चित्रपटाने दोन दिवसांत तुफान कमाई केली आहे. चित्रपटात अजय रकुल प्रीत सिंहसोबत झळकला आहे. 'दे दे प्यार दे २' सिनेमा १४ नोव्हेंबर २०२५ ला थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे.

अजय देवगणच्या 'दे दे प्यार दे २' बंपर ओपनिंग केली आहे. चित्रपटाने शुक्रवारी पहिल्या दिवशी ८.७५ कोटींचा व्यवसाय केला. तर चित्रपटाने दुसऱ्या दिवशी म्हणजे वीकेंडला शनिवारी छप्परफाड कमाई केली आहे. रिपोर्टनुसारनुसार, चित्रपटाने दुसऱ्या दिवशी १२.२५ कोटी रुपये कमावले आहे. चित्रपटाने दोन दिवसांत तब्बल २१.०० कोटी रुपयांची कमाई केली आहे. आता चित्रपट रविवारी किती कोटी कमावतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

'दे दे प्यार दे २' मध्ये आर. माधवन रकुल प्रीत सिंहच्या वडिलांची भूमिका साकारत असून तो अजय देवगण आणि रकुलच्या प्रेमात अडथळे निर्माण करताना दिसत आहे. चित्रपटाच्या पहिल्या भागात रकुल अजय देवगणच्या घरात जाते. यावेळी अजय देवगण रकुलच्या घरी राहायला येतो. रकुल अजयच्या वयाबद्दल पालकांना खोटे बोलते आणि हा रोमँटिक-कॉमेडी सुरू होतो. चित्रपटात गौतमी कपूर, जावेद



जाफरी, मीजान जाफरी, इशिता दत्ता आणि जानकी बोडीवाला हे कलाकार देखील झळकले आहेत.

दे दे प्यार दे २' चित्रपट २०१९ साली रिलीज झालेल्या 'दे दे प्यार दे' सिनेमाचा सीक्वल आहे. या भागात अजय देवगण आणि रकुल प्रीत सिंहसोबत तब्बू देखील मुख्य भूमिकेत होती. ती अजयची बायको दाखवली होती. जिमी शेरगिल, आलोक नाथ, जावेद जाफरी, भावीन भानुशाली, मधुमालती कपूर आणि कुमुद मिश्रा हे कलाकार देखील झळकले आहेत. या चित्रपटाने देखील बंपर कमाई केली.

## अभिनेते प्रेम चोप्रा यांना रुग्णालयातून मिळाला डिस्चार्ज

**मुंबई :** बॉलीवूडचे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना रुग्णालयात दाखल केल्याचं वृत्त समोर येताच त्यांच्या अनेक चाहत्यांना चिंता लागून राहिली होती. धर्मेंद्र यांच्यानंतर अभिनेते प्रेम चोप्रा यांनादेखील रुग्णालयात दाखल केल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे या दोन्ही दिग्गज कलाकारांचे चाहते त्यांच्या प्रकृतीविषयी चिंता व्यक्त करताना दिसले.

उपचारांनंतर आता धर्मेंद्र हे घरी परतले आहेत. त्यांना नुकताच डिस्चार्ज देण्यात आला आहे. अशातच प्रेम चोप्रा यांच्या प्रकृतीबाबतही एक बातमी समोर येत आहे, ती म्हणजे धर्मेंद्र यांच्यानंतर अभिनेते प्रेम चोप्रा यांनाही रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

छातीत दुखत असल्याच्या तक्रारीनंतर प्रेम चोप्रा यांना ८ नोव्हेंबर रोजी मुंबईच्या लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आता त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती देण्यात आली आहे.


माध्यमांमधील वृत्तांनुसार, रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले की प्रेम चोप्रा यांना आधीपासूनच हृदयासंबंधित त्रास होता आणि यासोबरच त्यांना व्हायरल इन्फेक्शनही झालं होतं. मात्र, आता त्यांची प्रकृती उत्तम असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केलं आहे.

प्रेम चोप्रा यांच्या वयानुसार प्रकृतीचा विचार करता, त्यांच्यावर काही दिवस काळजीपूर्वक लक्ष ठेवण्यात आले. कुटुंबीयांनी सांगितले की, त्यांनी उपचारांना चांगला प्रतिसाद दिला आणि प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्यांना शनिवारी घरी पाठवण्यात आले.

प्रेम चोप्रा यांना रुग्णालयात दाखल केले गेले, तेव्हा त्यांचे जावई विकास भल्ला यांनी प्रकृतीची माहिती दिली होती. ते म्हणाले होते की, काळजी करण्यासारखे काही नाही; ते नियमित तपासणीसाठी रुग्णालयात दाखल झाले आहेत. त्यांची प्रकृती स्थिर आहे आणि लवकरच त्यांना डिस्चार्ज देण्यात येईल.

दरम्यान, प्रेम चोप्रा यांच्याबद्दल सांगायचं झाल्यास, ९० वर्षांच्या प्रेम चोप्रा यांनी सहा दशकांच्या कारकिर्दीत ३८० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. दमदार अभिनय आणि हटके डायलॉग्समुळे ते हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय खलनायकांपैकी एक ठरले.

प्रेम नगर', 'उपकार' आणि 'बॉबी' सारखे क्लासिक चित्रपट देऊन अभिनेते प्रेम चोप्रा यांनी इंडस्ट्रीमध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या प्रकृतीबाबत आलेल्या वृत्तांनंतर चाहत्यांनी चिंता व्यक्त केली होती. पण आता प्रेम चोप्रा यांची प्रकृती स्थिर आहे आणि त्यांना घरी सोडण्यात आलं आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कुष्ठरोग शोध अभियानांतर्गत १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान घरोघरी तपासण्या

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात कुष्ठरोग शोध अभियानांतर्गत १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत सर्व जिल्ह्यांमध्ये व्यापक सर्वेक्षणाद्वारे कुष्ठरोगाचे रुग्ण शोधण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. अभियानांतर्गत ८ कोटी ६६ लाख लोकसंख्या आणि १ कोटी ७३ लाख २५ हजार घरे सर्वेक्षणासाठी निवडली असून, ६५ हजार ८३२ पथके आणि १३ हजार १६६ पर्यवेक्षक या मोहिमेसाठी नियुक्त करण्यात आले आहेत. ग्रामीण भागात प्रत्येक पथक दररोज २० घरे तर शहरी भागात २५ ते ३० घरांना भेट देऊन प्रत्यक्ष शारीरिक तपासणी करणार आहे. प्रत्येक पथकात एक आशा स्वयंसेविका आणि एक पुरुष स्वयंसेवक सहभागी असून, ते सलग १४ दिवस सर्वेक्षण करतील.कुष्ठरुग्ण शोध अभियानाच्या राज्यस्तरीय जनजागरण समितीची बैठक नुकतीच आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला आरोग्य सेवा सहसंचालक (क्षयरोग व कुष्ठरोग) डॉ. राजरत्न वाघमारे, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे सहायक संचालक डॉ. संजयकुमार जठार, दूरदर्शन प्रतिनिधी डॉ. आलोक खोब्रागडे, आकाशवाणी मुंबईचे राजेश शेजवले, अलर्ट इंडियाचे वरिष्ठ प्रोग्रामर विन्सेंट के. ए., ङ्गअपालफ्चे अध्यक्ष माया रणवरे, महाराष्ट्र कुष्ठ पीडित संघटनेच्या सदस्या मदिना शेख, तसेच जनसंपर्क अधिकारी विकास सावंत या बैठकीला उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना तसेच जिल्हाधिकारी व गावांच्या सरपंचांना पत्र लिहून ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. आपल्या जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियानात जास्तीत जास्त कुष्ठरुग्णांचे निदान निश्चितीसाठी सर्व यंत्रणांना मार्गदर्शन करुन आपल्या प्रभावी नेतृत्वाखाली ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश अबिटकर यांनी केले आहे. त्याचप्रमाणे आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. निपुण विनायक यांनी या अभियानाचा सखोल आढावा घेतला आणि सर्व जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे हे अभियान यशस्वी करण्यासाठी आवाहन केले आहे. राज्यातील नागरिकांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले असून, कुष्ठरोगावरील उपचार पूर्णपणे मोफत, प्रभावी आणि सर्व सरकारी आरोग्य यंत्रणेमार्फत सहज उपलब्ध असल्याची माहितीही आरोग्य विभागाने दिली आहे. संशयित रुग्णांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून, कुष्ठरोग निदान झाल्यास त्यांना तत्काळ बहुविध औषधोपचार सुरू करण्यात येणार आहे. घरोघर तपासणी करून समाजातील लपलेले, निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधून उपचाराखाली आणणे व संसर्गाची साखळी खंडित करणे, कुष्ठरोगाबाबत समाजात जनजागृती वाढवणे, सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसार या ध्येयाच्या दिशेने वाटचाल मजबूत करणे, ही या अभियानाची उद्दिष्ट्ये आहेत. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तरावर सर्वेक्षणाविषयी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली जात आहे. तसेच जिल्हा व तालुका स्तरावर समन्वय समित्या आणि प्रा.आ. केंद्रांवर पथक सदस्यांचे प्रशिक्षण सुद्धा सुरू आहे. राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने नुकतेच कुष्ठरोगाला ङ्गनोटिफायबल डिसीजफ म्हणून घोषित केले आहे. यानुसार कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग तसेच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणे आता सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे.

# जिल्हा रुग्णालयात अवयवदान जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न




**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालय आणि बजाज हॉस्पिटल, संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अवयवदान जनजागृती कार्यक्रम दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समाजामध्ये अवयवदानाबाबत जागृती वाढविणे आणि त्याचे महत्त्व समजावून देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या प्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, वैद्यकीय अधीक्षक डॉ. घोटे, नेत्रतज्ञ डॉ. रवी शिंदे, बजाज हॉस्पिटल, संभाजीनगर येथील डॉ. रोडे, (बाह्य रुग्ण विभाग) वैद्यकीय अधिकारी डॉ. घोंगटे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, नेत्र समुपदेशक योगेश सिरसाट, श्री. जाधव तसेच अन्य मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात तज्ञांनी अवयवदानाचे सामाजिक, वैद्यकीय आणि मानवी मूल्यांवरील महत्त्व पटवून दिले. मृत्यूनंतरही अवयवदानाद्वारे अनेकांचे प्राण वाचू शकतात, हा अत्यंत संवेदनशील व प्रेरणादायी संदेश नागरिकांना देण्यात आला. अवयवदानाबाबतच्या विविध प्रक्रियांची माहिती, त्यावरील गैरसमज दूर करणे आणि सामान्य जनतेमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचे मार्गदर्शनही कार्यक्रमात करण्यात आले.

# अवैध गौणखनिज उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या ४७ विना नंबर टिपर वाहनांवर जिल्हाधिकारी यांची धडक कारवाई

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाव्दारे विशेष मोहिम राबविली जात असून या मोहिमेअंतर्गत रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या नेतृत्वातील पथकाने अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्या ४७ टिपर वाहनांवर दंडात्मक कारवाई करत १० लाखांहून अधिक दंडाची वसुली करण्यात आली. तसेच देऊळगांव राजा तालुक्यातील सिंनगाव जहाँगीर व खल्याळ गव्हाण परिसरात जिल्हाधिकारी विशेष पथकाव्दारे अवैध वाळू उत्खननाच्या ठिकाणी धाड टाकून संबधितांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. यापूर्वी १४ ऑगस्ट २०२५ व रोजी देखील जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी अचानक अनेक ठिकाणी भेट देवून एकाच दिवशी ३० अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्या विनानंबर टिपरविरुद्ध ६.५० लाखांची दंडात्मक कारवाई केली होती. याचपद्धतीची १९ मे २०२५ रोजी देखील कारवाई त्यांनी केली होती. नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेंतर्गत आतापर्यंत ८९७ प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली असून संबधित ११० वाहन चालकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल, परिवहन, पोलीस व अन्य विभागाच्या संयुक्त कारवाईव्दारे जिल्ह्यात १ एप्रिल ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीसंदर्भात ८९७ प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली आहे. यापैकी ४१४ प्रकरणे अवैध उत्खनन, वाहतुक संबंधित आहेत. ४८३ विना नंबर वाहनांवर कारवाई केली, तर ११० प्रकरणांत गुन्हे दाखल केले आहेत. या सर्व कार्यवाहीमधून जिल्हा प्रशासनाने एकूण ४ कोटी ८७ लाख रुपयाची दंडात्मक कारवाई केली आहे. अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी जिल्हा महूसल, परिवहन, पोलीस व अन्य विभागाचे तालुकास्तरावर भरारी पथके कार्यरत आहेत. ही पथके गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करत आहेत. रॉयल्टी पासेस किंवा वाहतूक पासेस नसलेल्या वाहनांवर शासन नियमांनुसार दंडात्मक कारवाई केली जात आहे. नागरिकांना परिसरात



कुठेही अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक होत असल्याचे आढळल्यास, त्यांनी संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार किंवा पोलीस विभागास निर्दर्शनास आणून द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा नगराध्यक्ष पदासाठी सौ. अर्पितताताई विजयराज शिंदे यांनी भाजपा कडून दाखल केला उमेदवारी अर्ज

**जनसंचलन/बुलढाणा**

स्वर्गीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनी, त्यांच्या कार्याला व विचारांना अभिवादन करत आज माजी आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या पत्नी तथा समाजसेविका सौ. अर्पिताताई विजयराज शिंदे यांनी बुलढाणा नगराध्यक्ष पदासाठी भाजपाकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना अर्पिताताई शिंदे यांनी बुलढाणा शहराच्या सर्वांगीण विकासाचा ठाम निर्धार व्यक्त केला. नागरिकांच्या सुरक्षेला, महिलांच्या सशक्तीकरणाला आणि शहराच्या स्वच्छ, स्वास्थ्यदायी भविष्यास प्राधान्य देण्याचा आपला संकल्प असल्याचे यावेळी त्यांनी स्पष्ट केला.

त्या म्हणाल्या, भयमुक्त, भ्रष्टाचारमुक्त आणि नशामुक्त बुलढाणा शहर घडवणे हीच माझी पहिली प्राथमिकता असेल. महिलांची सुरक्षितता, तरुणांना संधी, आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारी भ्रष्टाचार विरहित, सुटसुटीत प्रशासन प्रणाली निर्माण करणे हा माझा मुख्य उद्देश आहे. अर्पिताताईंनी पुढे सांगितले की, शहरातील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, स्मार्ट नागरी सेवा या क्षेत्रांत ठोस बदल घडवून आणण्यासाठी त्या कटिबद्ध आहेत. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन प्रत्येक नागरिकाचा सन्मान, सुरक्षितता आणि विकास हा माझा केंद्रबिंदू असेल, असेही त्यांनी सांगितले. उमेदवारी अर्ज दाखल करताना जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे, राष्ट्रवादीचे जिल्हा निवडणूक प्रभारी टी. डी. अंभोरे, बुलढाणा नगरपा निवडणुचे प्रभारी विश्वनाथ माळी, जिल्हा सरचिटणीस दत्ता पाटील, सुनील भाऊ जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, ज्येष्ठ नेते दीपक वारे, विश्राम पवार, शहराध्यक्ष मंदार बाहेकर, सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष मोहन पवार, बुलढाणा तालुकाध्यक्ष सतीश भाकरे पाटील, विधी आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुनील देशमुख, महिला आघाडीच्या प्रदेश प्रतिनिधी सौ. सिंधुताई खेडेकर, अल्पसंख्यांक आघाडीचे शहराध्यक्ष मोहम्मद अखिल खान हाजी भाई, किसन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष दीपक वारे, पुरुषोत्तम लखोटिया, अरविंद होंडे, पवन बगाडे, मुकुंद देशपांडे, मुन्ना बेडवाल, नितीन बेडवाल, किरण नाईक, शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष नरोटे, यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने बुलढाण्यात निवडणूक



चुरस अधिक रंगतदार होण्याचे संकेत आहेत. याप्रसंगी अर्पिताताई शिंदे यांनी सांगितले की, पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी जी यांच्या सबका साथ, सबका विकास या विकासदृष्टीच्या ब्रीदवाक्याने आणि महाराष्ट्राचे वेगवान, गतिमान सरकार देणारे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाखाली बुलढाणा शहराच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. न खाऊंगा, न खाने दूंगा या मोदीजींच्या भूमिकेप्रमाणे मी पूर्ण पारदर्शकतेने आणि जनहिताला केंद्रस्थानी ठेवून कारभार करणार आहे. नागरिकांनी मला संधी दिली तर या संधीचं सोनं करून बुलढाणा शहराला सुंदर, स्वच्छ, सुरक्षित आणि विकसित शहर बनविण्याचे स्वप्न नक्कीच पूर्ण करेन, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# बुलढाणा चे इतिहासात प्रथमच भारत विद्यालयाचा मुलींचा लेदर बॉल क्रिकेट संघ राज्यस्तरावर...

**जनसंचलन/बुलढाणा**

नुकत्याच मलकापूर येथे झालेल्या १९ वर्षाखालील मुलींच्या शालेय विभागस्तरीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेमध्ये भारत विद्यालय बुलढाणा च्या संघाने अजिंक्यपद प्राप्त केले . बुलढाणा शहरातून क्रिकेट मध्ये अशी कामगिरी करणारा मुलींचा हा पहिलाच संघ ठरलेला आहे. ह्या स्पर्धेत उपांत्य सामन्यात अमरावती जिल्हावर तर अंतिम सामन्यात यवतमाळ जिल्ह्यावर दणदणीत विजय प्राप्त केला. फलंदाजी मध्ये नेहमीच उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या यष्टिरक्षक कर्णधार प्रणिता उगले हिला फलंदाजी मध्ये ऋतुजा पंडित हिची चांगली साथ मिळाली. तर गोलंदाजी मध्ये वेगवान गोलंदाज मृणाल पडोळसे सोबत प्रतीक्षा खरे , प्रगती लोखंडे, कृष्णाली देशपांडे, तन्वी तायडे, ऋतुजा पंडित यांनी धुरा सांभाळली. भारत च्या मुलींनी क्षेत्ररक्षण मध्ये देखील चमकदार कामगिरी केली. स्पर्धेनंतर झालेल्या बक्षीस वितरण कार्यक्रमामध्ये विभागस्तर विजेतेपदाचा चषक कर्णधार प्रणिता उगले व उपकर्णधार ऋतुजा पंडित यांनी सौ.हर्षल अग्रवाल व सौ. शितल अग्रवाल यांचे हस्ते सर्व संघासमवेत स्वीकारला.

भारत विद्यालय बुलढाणा चे ३८ वा राज्यस्तरवर पोहोचलेला संघ ठरला. या वर्षी भारत विद्यालयाच्या मुलांच्या १४ व १७ वर्षाखालील क्रिकेट संघ देखील विभागस्तर खेळण्यासाठी जाणार आहे.

ङ्खअजिंक्य, अभेद्य, अविरतङ्ख हे ब्रीदवाक्य असणाऱ्या भारत विद्यालय , बुलडाणा ने क्रिकेट विश्वावर असलेला दबदबा याही वर्षी कायम ठेवला आहे. टेनिस बॉल स्पर्धेत देखील भारत चे १९ वर्षाखालील मुलींचा संघ व १७ वर्षाखालील मुलांचा संघ विभागस्तर साठी पात्र ठरला आहे हे विशेष.

भारत विद्यालयाच्या अध्यक्षा डॉ सीमा आगाशे , सचिव अंगद आगाशे, प्राचार्य प्रल्हाद गायकवाड, उप प्राचार्य मोहन घोंघटे, पर्यवेक्षक नवल गवई, जिल्हाक्रीडाधिकारी श्री बाळकृष्ण महानकर साहेब, तालुका क्रीडाधिकारी श्री लक्ष्मीशंकर यादव सर, श्री मनोज श्रीवास सर, श्री चंद्रकांत साळूंके सर, श्री राजेश भोसले सर तसेच संघाचे प्रशिक्षक संजय देवल, प्रशिक्षक सावरमल शर्मा, अरुण सौभागे ,संदेश पाटील, रोहन शेटे, दिनेश गर्गे, अमोल बाळ यांनी सर्व खेळाडूं हार्दिक अभिनंदन केले आहे तसेच पुढील वाटचाली साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. सतरा वर्षाखालील मुलीचां क्रिकेट संघ:-



प्रणिता उगले( कर्णधार , यष्टीरक्षक ), ऋतुजा पंडित, रइया पठाण, प्रगती लोखंडे, वेदिका गवळी, कृष्णाली देशपांडे, भाग्यश्री भामद्रे, तन्वी तायडे, सायली साखरे, सानिका लहाने, मृणाल पडोळसे,प्रतीक्षा खरे, सुजाता हिवाळे, रिद्धी कोकाटे, स्नेहल सुरशे, ज्ञानेश्वरी डोखळे प्रशिक्षक संजय देवल, सावरमल शर्मा. पंच: समीर शेख, ऋतुजा शिंपी,नैतिकशुक्ल.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८